परिवहन समितीच्या गुरूवार **दिनांक ३१—०८—२०१७** रोजी **दुपारी ०२:००** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

उपस्थित सदस्य

अ. क्र	नावे	पद
1.	मा. श्री. जितेंद्र धनराज कुकडे	**सभापती**
2.	मा. श्री. प्रवीण विलासराव भिसीकर	**सदस्य**
3.	मा. सौ. अर्चना विवेक पाठक	**सदस्या**
4.	मा. सौ. उज्वला प्रकाश शर्मा	**सदस्या**
5.	मा. सौ. वैशाली देवचंद रोहणकर	**सदस्या**
6.	मा. श्री. नरेंद्र नत्थुजी वालदे	**सदस्य**
7.	मा. सौ. अभिरूची अनिल राजगिरे	**सदस्या**
8.	मा. सौ. विद्या योगेश मडावी	**सदस्या**
9.	मा. श्री. नितीन रामभाऊ साठवणे	**सदस्य**
10.	मा. सौ. कल्पना राम कुंभलकर	**सदस्या**
11.	मा. श्री. नितीश गंगाप्रसाद ग्वालबंशी	**सदस्य**

अनुपस्थित सदस्य

1.	मा. सौ. मनिषा आशिष धावडे	**सदस्या**
2.	**श्री. संदीप चंद्रभान जाधव** **सभापती स्थायी समिती — पदेन सदस्य**	**सदस्य**

उपस्थित अधिकारी

अ. क्र	नावे	पद
1.	**श्री. शिवाजी जगताप**	**परिवहन व्यवस्थापक**
2.	**श्री. हरिष दुबे**	**निगम सचिव**

मा.सभापती, यांनी परिवहन समितीच्या सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

ठराव क्रमांक १३:— नागपूर शहरातील NCC (Net Cost Contract) तत्वावर दि. ०१/०३/२०१७ रोजी पासुन डिझेल व इथेनॉल इंधन संचलित बसेसची वाहतुक सुरू करण्यात आलेली आहे. पर्यावरण पुरक व शहरातील कार्बन फुटप्रिंट कमी करण्यास्तव ग्रिन बसेस चालविण्याचा धोरणात्मक निर्णय नागपूर महानगरपालिकेने यापुर्वी घेतलेला आहे. याकरीता Bio-CNG ची मनपास आवश्यकता राहील, जेणेकरून हे इंधन डिझेलचा पर्याय म्हणून वापरता येईल. त्यामुळे प्रदुषण दुर होण्यासोबतच मनपाची आर्थिक बचत सुध्दा अपेक्षित आहे.

मनपाच्या मलनि:सारण केंद्रातुन शुध्दीकरण प्रक्रियेनंतर तयार होणाऱ्या उप—उत्पादनांमध्ये By-Product Raw Bio-Gas चा समावेश आहे. ज्यावर प्रक्रिया करून Bio-CNG प्राप्त होवू शकेल. या विषयी कार्यकारी अभियंता, पेंच प्रोजेक्ट सेल यांनी दि. १४/०८/२०१७ रोजी सादर केलेल्या टिपणीद्वारे मा. आयुक्त, मनपा यांचे सुचनेप्रमाणे प्रथम टप्प्यात Bio-CNG च्या उपलब्धतेनुसार एसी बसेस संचलनाकरीता परिवहन विभागाकडे नस्ती सादर केली. याकरीता सल्लागाराचे नियुक्ती प्रक्रियेसाठी स्वारस्य अभिव्यक्ती (EOI – Expression of Interest) प्रसुत करण्याकरीता Transaction Adivisory सेवा ही परिवहन विभागातर्फे स्वतंत्रपणे हाताळण्याचे निर्देश मा. आयुक्त, मनपा यांनी दि. २१/०८/२०१७ रोजी दिले.

करीता वातानुकुलीत Bio-CNG इंधनावर संचलित बसेसची खरेदी, संचलन व देखभालीस साधारणपणे २५ बसेसकरीता Bio-CNG चे उत्पादन व Bio-CNG कारखान्याचे संचलन व देखभाल देखिल अंतर्भुत असणाऱ्या एकीकृत प्रकल्पाची संपुर्ण कार्यान्विकरण करण्याकरीता अनुभवी व तज्ञ सल्लागाराची नियुक्ती करण्याबाबत परिवहन समितीद्वारे मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून मा.सदस्य श्री.नरेंद्र वालदे आणि मा.सदस्य श्री.नितीन साठवणे यांनी या विषयाला विरोध दर्शविला व त्यास समितीने बहुमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक १४:— 'आपली बस' शहरबस सेवेअंतर्गत विशेष फेऱ्यांच्या सेवेकरिता नविन मिडी मॉडेलसह बसेसवरील रंगसंगती निश्चितीबाबत चा प्रश्न समितीने विचारात घेवून समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक १५:— परिवहन विभागातील आस्थापणा पद निर्मिती प्रक्रियेस लागणारा कालावधी तसेच सध्या विभागीय कामामध्ये झालेली प्रचंडवाढ लक्षात घेता व परिवहन विभागाकडे पूरेसा कर्मचारी वर्ग नसल्याने सध्या कार्यरत कंत्राटी पदाअंतर्गत असलेले कर्मचारी वर्ग यांना त्यांचे मंजुर मानधनावर तात्पुरत्या स्वरूपात मा. आयुक्त व परिवहन समितीने दिलेली मान्यता दि. ३०/११/२०१६ रोजी संपुष्टात येत असल्याने पुढील ६ महिण्याकरीता मुदतवाढ देण्याचा प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

(अ) कंत्राटी कर्मचाऱ्यांचे कालावधी व मंजूर मानधन खालीलप्रमाणे आहे.

अ. क्र.	नांव	पदनाम	कालावधी	मानधन
१)	श्री. एस. जे. सोनटक्के	वाहतुक व्यवस्थापक	३१/०५/२०१६	२०,०००/—
२)	श्री. प्रविण सरोदे	पर्यवेक्षक (तांत्रिक)	३१/०५/२०१६	१५,०००/—
३)	श्री. विजय चौरसिया	पर्यवेक्षक (अतांत्रिक)	३१/०५/२०१६	१२,०००/—
४)	श्री. रामराव मातकर	पर्यवेक्षक (अतांत्रिक)	३१/०५/२०१६	१०,०००/—

वरील तात्पुरते अधिकारी/पर्यवेक्षक यांनी दि. २०/०३/२०१४ रोजी मासिक वेतनामध्ये वाढ करण्याबाबत निवेदन मा. उपायुक्त तथा परिवहन व्यवस्थापक यांना सादर करण्यात आले होते. मात्र त्यावर सकारात्मक कार्यवाही करण्यात आलेली नसल्यामुळे

पुनश्च: निवेदन दि. ०५/०८/२०१६ रोजी परिवहन व्यवस्थापक, मनपा यांना सादर करण्यात आले.

वर्ष २०११—१२ पर्यंत VNIL सोबत पत्र व्यवहार, बसेसची तांत्रीक तपासणी व इतर कार्य करण्याची जवाबदारी त्यावेळेस अस्तित्वात असलेले नागपूर महानगर परिवहन लि. मध्ये कार्यरत अधिकारी/पर्यवेक्षकांकडे होती. मात्र माहे डिसे. २०१३ पासुन महाराष्ट्र महानगरपालिका कॉर्पोरेशन अक्ट १९४९ अंतर्गत नागपूर महानगरपालिकेचे कार्य सुरू झाल्याने महाराष्ट्र शासनाचे मंजूरीने नागपूर महानगर परिवहन लि. कंपनी बरखास्त करण्यात आली व परिवहन समितीचे गठन करण्यात आले.

डिसेंबर २०१२ ते आज पर्यंत उपरोक्त नमुद कामा व्यक्तिरिक्त खाली नमुद केलेल्या कामामध्ये वाढ झालेली आहे.

१) नविन ०३ डिझेल बस ऑपरेटर, ०१ एसी ग्रीन बस ऑपरेटर व ०१ आय.बी. टी.एम. ऑपरेटरची नियुक्ती बध्दलची कार्यवाही, पत्रव्यवहार व तत्सम कामे. उदा. फेअर कलेक्शन एजेन्सी, वाहक तिकीट मशीन एजेन्सीची नियुक्ती प्रक्रिया.
२) रेडियो मॅक्सी कॅब संबधी कामकाज.
३) नविन गठीत परिवहन समितिचे कामकाज.
४) म्युझिक सिस्टिम संबंधी कार्य.
५) वार्षिक बजेट संबंधी कार्य.
६) ऑडीट पॅराचे उत्तर व पत्रव्यवहार करणे.

परिवहन कार्यालयात सध्या कर्मच्यांची कमतरता असल्याने कार्यरत अधिकारी/ पर्यवेक्षकांच्या कामाचा व्याप वाढलेला आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका कॉर्पोरेशन ॲक्ट १९४९ च्या कलम क्र. ३४८ अन्वये परिवहन व्यवस्थापक व परिवहन समितीमार्फत तात्पुरते कर्मचाऱ्यांची नेमणुक तसेच त्यांचे मासिक वेतन निश्चित करण्याचे स्पष्ट नमुद आहे.

(ब) त्यामुळे उपरोक्त नमुद स्थितीच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे मासिक वेतनामध्ये वाढ करण्याची विनंती केलेली आहे.

अ.क्रं.	नांव	पदनांव	मासिक मानधन
१)	श्री. सुकिर सोनटक्के	वाहतुक व्यवस्थापक	रु. ३५,०००/—
२)	श्री. प्रविण सरोदे	पर्यवेक्षक (तांत्रिक)	रु. ३०,०००/—

उपरोक्त (अ) मध्ये नमुद श्री. विजय चौरसिया (अतांत्रिक पर्यवेक्षक) हे गत ०३ ते ०४ महिन्यांपासुन परिवहन सेवेत कार्यरत नसुन त्यांची परिवहन विभागास त्यांना सोपविलेल्या कुठल्याही प्रकारच्या कामाची मदत होत नाही. तसेच श्री. रामराव मातकर (अतांत्रिक पर्यवेक्षक) यांचे कामाकाज देखिल अत्यंत असमाधानकारक असून दैनिक कामगीरीत नियमितता नाही. तसेच वाहतुक विषयाशी संबंधीत कामे हाताळण्यात निष्काळजीपणा आहे.

करीता (अ) मधील अनु. क्र. ३ व ४ वरील श्री. विजय चौरसिया व श्री. रामराव मातकर यांची सेवा खंडीत करून (अ) मधील अनु. क्र. १ व २ मधील नमुद श्री. सुकीर सोनटक्के व श्री. प्रविण सरोदे यांना पुढील मुदतवाढ देण्यात यावी.

करीता उपरोक्त वेतनामधील वाढ दि. ०१/१२/२०१६ पासुन अपेक्षित आहे. तसेच हयापुढे दरवर्षी रू. २,०००/— ची वाढ करणे आवश्यक आहे. जेणेकरून परिवहन विभागात वाढलेल्या कामाच्या अनुषंगाने वेतन मिळेल.

उपरोक्त प्रस्तावास तत्कालिन मा. सभापती, परिवहन समिती, मनपा यांनी दि. ३०/१२/२०१६ रोजी तत्वता: मान्यता दिलेली असून त्यास तत्कालिन मा. आयुक्त, मनपा यांनी सुध्दा दि. १२/०१/२०१७ रोजी प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. सदर प्रस्तावास दि. ०१/१२/२०१६ ते दि. ३१/०५/२०१७ व दि. ०१/०६/२०१७ ते पुढील सहा महिन्याकरीता मान्यता प्रदान करण्यास्तव तसेच वाढीव मानधनाबाबतचा प्रश्न समितीने विचारात घेवून प्रस्तावात नमूद दोन्ही बाबींचा प्रशासनाने अभ्यास करून फेरप्रस्ताव सादर करण्याकरिता हा विषय कार्यालयास परत करण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक १६:— नागपूर महानगरपालिकेच्या परिवहन विभागातील कार्यरत कंत्राटी पर्यवेक्षक श्री. रामराव मातकर यांचेकडे सध्या शहरबस वाहतुकीतील मार्ग, बस थांबे, मा. पदाधिकारी/नगरसेवक तथा संस्था व नागरिक यांचेकडून प्राप्त बस संबधीत तक्रारी व मागणीचे निराकरण अश्या महत्वपुर्ण कामाची जबाबदारी आहे. त्यांच्या कामाचा व्याप लक्षात घेता तत्कालिन मा. सभापती, परिवहन समिती, मनपा यांनी दि. ३०/१२/२०१६ रोजी रू. १०,०००/— ऐवजी रू. १४,०००/— एवढया मानधनास तत्वत: मान्यता दिलेली असून त्यास तत्कालिन मा. आयुक्त, मनपा यांनी सुध्दा दि. १२/०१/२०१७ रोजी प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

श्री. रामराव मातकर यांनी मा. सभापती, परिवहन समिती, मनपा यांना दि. २९/०६/२०१७ रोजी दिलेल्या निवेदनात मागील वाढ झालेले मानधन हे कामांचे व्याप लक्षात घेता फारच कमी असल्याचे नमुद केलेले असून आपले मानधन हे रू. २२,०००/— करण्याबाबत निवेदनात विनंती केलेली आहे. त्यास मा. सभापती, परिवहन समिती, मनपा यांनी दि. ३०/०६/२०१७ रोजी सदर मागणीस तत्वत: मान्यता दिलेली आहे.

त्याअनुषंगाने, श्री. रामराव मातकर यांनी मासिक वेतन/मानधन हे माहे. ऑगस्ट २०१७ रोजी पासुन रू. १४,०००/— ऐवजी रू. २२,०००/— वाढीव मानधन देण्यास परिवहन समितीच्या वतीने मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून प्रस्तावात नमूद दोन्ही बाबींचा प्रशासनाने अभ्यास करून फेरप्रस्ताव सादर करण्याकरिता हा विषय कार्यालयास परत करण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक १७:— नागपूर महानगरपालिकेच्या परिवहन विभाग व परिवहन समितीमधील वित्तीय व लेखा विषयक कामकाज करण्याकरीता शासकीय वित्त व लेखा विभागातुन सेवानिवृत्त झालेले श्री. विनय बी. भारद्वाज, सेवानिवृत्त लेखाधिकारी यांची कंत्राटी

पध्दतीवर नियुक्ती करण्यात आलेली आहे.दि.०७/१०/२०१६ ते ०६/०४/२०१७ पर्यत ०६ महिन्याचे कालावधी करीता मुदतवाढ व रू. २२,०००/— दरमाह मानधन या प्रस्तावास तत्कालिन मा. परिवहन सभापती, परिवहन समिती, मनपा यांनी दि. ३०/१२/२०१६ रोजी तत्वत: मान्यता दिलेली असून त्यास तत्कालीन मा. आयुक्त, मनपा यांनी सुध्दा दि. १२/०१/२०१७ रोजी प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

सदर प्रस्तावास दि. ०७/१०/२०१६ ते दि. ०६/०४/२०१७ व दि. ०७/०४/२०१७ ते पुढील ०६ महिन्याकरीता मान्यता प्रदान करण्यास्तव तसेच वाढीव मानधनाबाबतचा प्रश्न समितीने विचारात घेवून प्रस्तावात नमूद दोन्ही बाबींचा प्रशासनाने अभ्यास करून फेरप्रस्ताव सादर करण्याकरिता हा विषय कार्यालयास परत करण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक १८:— नागपूर शहरबस वाहतुकीचे दि. ०१/०३/२०१७ रोजी पासुन नव्याने संचालित झालेल्या प्रकल्पामध्ये एकत्रित बस वाहतुक व्यवस्थापन (IBTM), जे याकरीता प्रकल्प विकास देणाऱ्या संस्थेअंतर्गत मे. दिल्ली इंटीग्रेटेट मल्टीमोडेल ट्रान्झिट सिस्टिम लि. यांचेद्वारे करण्यात येत आहे. मे. डिम्टर्स् हा दिल्ली शासन व आय.डी.एफ. सी. फांउडेशन यांचा संयुक्त उपक्रम असून आय.बी.टी.एम. ऑपरेटरचे एकत्रित व्यवस्थापन हा प्रकल्पाचा मुख्य आधार आहे. या ऑपरेटर करीता आर.एफ.पी. तील कलम क्र. ६.१.१० अन्वये मनपाकडे परफार्म्सस गॅरेटी ही बॅंक गॅरेटीच्या स्वरूपात व कंत्राट किमतीचे ५ टक्के रक्कम भरणे अपेक्षित होते. तथापी, याकरीता कंत्राटाचे मुल्य हे ४८७ बसेस व ०९ बस डेपो मनपाद्वारे कार्यान्वित केले जातील यावर आधारभुत होते. मात्र सद्य:स्थितीत, मनपाद्वारे तात्पुरते स्वरूपात फक्त ०४ डेपोद्वारे ३१० बसेसची वाहतुक सुरू आहे. कंत्राट कालावधी हा ७२ महिणे (६ वर्ष) असा असुन निविदेतील प्रकल्प रक्कम रू. १०७,९२,५५,४४८/— इतकी आहे. या रक्कमेचे ५ टक्के कंत्राट मुल्य काढल्यास बॅंक गॅरेटी हीरू. ०५,३९,६२,७७२/— इतकी येत असल्याने ती भरण्याबाबत परिवहन विभागाच्या वतीने मे. डिम्स् यांना वेळोवेळी कळविण्यात आले आहे.

मे. डिम्टस यांनी आर.एफ.पी. तील कलम क्र. १.१.१० मधील परफार्मन्स बॅंक गॅरेटी ही वार्षिक नुतणकरणीय बाब असल्याने ०१ वर्षाच्या कंत्राट मुल्याची ०५ टक्के रक्कम रू. ८९,९३,७९५/— भरण्याची तयारी दर्शविली. सबब बॅंक गॅरेटीच्या रक्कमेवरून दोन्ही बाजुने आक्षेप असल्याने याबाबत प्रशासकीय निर्णय घेण्याकरीता मा. आयुक्त, मनपा यांना वस्तुस्थिती स्पष्ट करून टिपणी सादर करण्यात आली. मा. आयुक्त, मनपा यांनी टिपणीचे अवलोकन केल्यानंतर हया प्रकरणी विधी सल्लागार यांचे अभिमत घेण्याचे आदेशित केले. मनपा अभियोक्ता यांचेद्वारे सदर प्रकरण ॲड. ए.एम. काझी यांचेकडे पाठविण्यात आले व ॲड. ए.एम. काझी यांनी नस्तीतील पान क्र. ३९, ४०, ४१ यावर त्यांचे अभिमत नोंदविलेले असून परिवहन विभाग, मनपा यांनी कलम क्र. ६.१.१० चा लावलेला अर्थ (Interpretation) योग्य असून मे. डीम्टर्स् यांनी कलमचा काढलेला अर्थ मान्य केलेला नाही. निर्माण झालेला तिढा हा सोडविण्याच्या दृष्टीने Value of Contract (प्रकल्प मुल्य) हे सुरू असलेल्या डेपो व सरासरी वाहनांवर आधाराभुत असावे, या मे. डीम्टर्स् यांनी चर्चे दरम्यान सादर केलेल्या पर्यायास अनुसरून सध्याचे अंदाजित किमंतीच्या ५ टक्के रक्कम ही रू. ३,२५,७१,८२३/— एवढी येत असून ही

रक्कम दोन्ही पक्षांना मान्य असल्यासच खालील मुद्यांच्या पुर्ततेस अनुसरून निर्णय घेणे उचित ठरेल.

खालील नमुद अटीच्या अधिन राहुन पुर्तता करता येवू शकेल :—

१) दोन्ही पक्षांच्या सामंजस्याने हा निर्णय घेण्यात यावा.

२) प्रस्तावित केलेल्या रक्कमेची परफार्मन्स बॅंक गॅरेटी कंत्राटदारा द्वारे भरण्याची हमीपत्राचे अधिन राहुन पुर्तता करण्यात यावी.

३) तसेच या परिवहन विभागाचे प्रस्तावित विषयी सक्षम प्राधिकारी म्हणून मा. परिवहन समिती यांचे मान्यतेचे अधिन राहुन हा निर्णय घेण्यात यावा.

४) भविष्यात वाढ होणाऱ्या डेपो व वाहनांच्या संख्येस अनुसरून व मुळ निविदा करारातील अटी व शर्तीच्या अधिन राहुन रक्कम भरणे कंत्राटदारास बंधनकारक राहील.

प्रस्तुत विषयी परफार्मन्स बॅंक गॅरेटी रक्कम निश्चिती मधील कलम ६.१.१० चा अर्थ लावणे Interpretation) मधील मतभिन्नता असल्याने प्रकल्प सुरू झाल्यापासुन मे. डीम्टर्स् यांचे दि. ०१/०३/२०१७ पासुन आतापर्यंतचे सेवादेयक मनपाद्वारे अदायगी करण्यात आलेली नाही, तसेच सेवादेयक रककम थकीत असल्याने व संबंधीत प्रकल्प पुढे चालविणे शक्य होत नसल्याचे मे. डीम्टर्स् यांनी पत्र क्र. १३९/डीम्टस्/२०१७, दि. ०३/०८/२०१७ द्वारे कळविले आहे.

करीता विधी सल्लागार यांचे अभिमतास अनुसरून मा. आयुक्त यांनी रितसर चाकोरीमार्फत (Through Proper Channel) प्रस्ताव सादर करण्याचे निर्देशित केले असल्याने वरीलप्रमाणे नमुद बॅंक गॅरेटी रू. ३,२५,७१,८२३/— आकारण्याबाबत परिवहन समिती द्वारे मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून खालीलप्रमाणे मा.महापौरजी यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

1. मा.महापौर	अध्यक्ष
2. मा.उपमहापौर	सदस्य
3. मा.सभापती, स्थायी समिती	सदस्य
4. मा.सत्तापक्ष नेते	सदस्य
5. मा.सभापती, परिवहन समिती	सदस्य
6. मा.आयुक्त	पदेन सदस्य

ठराव क्रमांक १९:— दि. २६/०५/२०१७ रोजी परिवहन समितीची १२ सदस्याची समिती स्थापन झाली व दि. ०१/०६/२०१७ रोजी परिवहन समितीचे मा. सभापती यांचे पदग्रहण समारंभ संपन्न झाला व परिवहन समितीचे कामकाज सुरू झाले.

त्यापुर्वी परिवहन विभागाचे अंतर्गत आर्थिक वर्षनिहाय सन २०१६—१७ मध्ये माहे. मार्च २०१७ पर्यंत रू. १५ कोटी मंजुर निधी होता. त्यापैकी या आर्थिक वर्षात रू. ४,६७,३७,२९२/— एकूण खर्च झाला.

त्याचप्रमाणे आर्थिक वर्ष २०१७—१८ मध्ये मनपा निधीतुन रू. १०८ कोटी निधी मंजुर करण्यात आला असून NMC The City of Nagpur Transport Fund या बॅक ऑफ महाराष्ट्र, सिव्हील लाईन्स् नागपूर च्या Current Account मध्ये माहे. डिसे. २०१६ ते जुन २०१७ पर्यंत रू. १७,६७,३०,०३६/— तिकीट विक्रीचा महसुल जमा झाला आहे. त्यापैकी माहे. एप्रिल ते जुन २०१७ पर्यंत एकूण रू. २०,१७,६६,९५१/— हा विविध लेखाशिर्षा अंतर्गत खर्च झाला आहे.
आर्थिक वर्ष २०१६—१७ मध्ये माहे. मार्च २०१७ पर्यंत झालेला एकूण खर्च रू. ४,६७,३७,२९२/— व अर्थिक वर्ष २०१७—१८ मध्ये माहे. एप्रिल ते जुन २०१७ पर्यंत झालेला एकूण खर्च रू. २०,१७,६६,९५१/— असा एकूण खर्च रू. २४,८५,०४,२४३/— या खर्चाचा लेखाजोखा परिवहन समिती समक्ष सादर करून मान्यता प्राप्त करून घेणे, तसेच या नंतर दरमाह झालेल्या जमाखर्चाचा लेखाजोखा होणाऱ्या पुढील महिन्याचे प्रथम सभेत मान्यता प्राप्त करून कार्योत्तर वित्तीय मान्यता घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून एकमताने मंजुरी प्रदान केली.

सभापतीः— भंगार काढण्याविषयी ३ सदस्यांची समिती तयार करावयाची होती ती समिती तयार झाली काय?

परिवहन व्यवस्थापकः— मा.सभापती, मागच्या बैठकीमध्ये चर्चा झाली होती. आपल्याकडे ज्या सध्या कंडम होणा—या गाडया आहेत त्या तशाच्या तशा घेतल्या आहे.

सभापतीः— दुसरी एक समिती तयार करावयाची आहे. कंपनीमार्फत जी कन्डॅक्टरची भरती करण्यात येत आहे त्यामध्ये एका कंपनी मार्फत 7 हजार रू. मानधन देत आहे तर दुस—या कंपनीमार्फत 12 हजार रू.मानधन देत आहे. नियमानुसार कन्डॅक्टरचे मानधन हे समसमान असले पाहिजे याकरिता समितीच्या पाच सदस्याची एक समिती तयार करून लवकरात लवकर यावर निर्णय घेण्यात येईल.

श्री.वालदेः— मा.सभापती, प्रत्येक एजन्सी कन्डॅक्टरला देण्यात येणा—या पगारामध्ये कमी जास्त केले नाही पाहिजे. कन्डॅक्टरला जे मानधन देण्यात येते ते समसमान असले पाहिजे.

सभापतीः—एक कंपनी मार्फत 7 हजार रू. मानधन देत आहे तर दुस—या कंपनीमार्फत 12 हजार रू.मानधन देत आहे. ही कॅन्डॅक्टरची भरती गोरगरीब जनतेतून करण्यात येणार आहे याकरिता एक समिती तयार करण्यात यावी. जर एजन्सी याला नाकारत असेल तर त्यांच्यावर दंडात्मक कार्यवाही सुध्दा करण्यात येईल.

श्री.नितीश ग्वालबंशीः— मा.सभापती, एजन्सीमार्फत जो डेपो खडे किये गये है उसकी पाहणीदौरा किया जाये । उनका रेकार्ड मेन्टेन होता क्या? उनकी काम करने की क्या प्रणाली है । वाऊचर बुक रखा जाता है क्या?

परिवहन व्यवस्थापकः— मा.सभापती, याकरिता तारीख निश्चित करण्यात यावी. तारखा निश्चित झाल्यास त्या त्या डेपोला भेटी देण्यासाठी व्यवस्था करण्यास सोयीचे होईल.

श्री.नितीन साठवणेः— मा.सभापती, मे. डिम्टर्स् मार्फत शहरातील शहर बस वाहने वेगाने चालविण्यात येतात याविषयी कुणाकडे तक्रार देण्यात यावी. शंकर नगर येथे बेरीकेट लागलेले आहे. त्याठिकाणी वेगाने गाडी चालवून बेरीकेट ठोसण्यात आले.

सभापतीः— मी कित्येक पत्र दिलेले आहे. रश ड्रायव्हिंग,स्कॅपिंग, बस स्टॉफ सोडून बस थांबविणे याविषयी विभागाकडे पत्रव्यवहार केलेला असून या विषयी पाहणी करून कार्यवाही करण्याविषयी सांगितले आहे. मे.डिम्टर्स् च्या लोकांवर कार्यवाही करण्यात आली काय याचे उत्तर देण्यात यावे.

श्री.प्रविण भिसीकरः— मा.सभापती, मे.डिम्टर्स् वर कोणती कार्यवाही केली हे मला विचारावयाचे आहे. पत्रव्यवहार झाल्यावरही कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही.

सभापतीः— रश ड्रायव्हिंगच्या संदर्भात अनेक मा.सदस्यांच्या तक्रारी आहेत. यावर कार्यवाही कां करण्यात आली नाही.

परिवहन व्यवस्थापकः—मा.सभापती 385 तक्रारी आलेल्या आहेत. याविषयी पत्र पाठविलेले आहे. दोन लोकांना निलंबित केलेले आहे. दुस—या एकाला दहा दिवसाकरिता बाहेर काढले होते. सगळी माहिती घेवून पुढच्या सभेत सादर करतो.

सभापतीः— मा.सदस्यांनी तक्रार केल्यावर कार्यवाही करण्यास किती दिवस लागणार आहे.

परिवहन व्यवस्थापकः— मा.सभापती, मा.सदस्यांनी केलेल्या तक्रारीनुसार सगळया प्रकारची कार्यवाही पुर्ण करण्यात आली आहे. छिंदवाडा रस्त्यावर झालेल्या रश ड्रायव्हींग प्रकरणी तक्रार आणि कार्यवाही याचा संपुर्ण अहवाल पुढच्या सभेत निश्चितपणे सादर करण्यात येईल.

सभापतीः— पुढच्या बैठकीची वाट पाहण्याची आवश्यकता नाही. समितीच्या कार्यालयातून सर्व मा.सदस्यांना बोलावून काय कार्यवाही केली ते सांगण्यात यावे.

श्री.प्रविण भिसीकरः— मा.सभापती, परिवहन व्यवस्थापकाची जागा डेप्युटेशनवर आहे की कशी आहे.

परिवहन व्यवस्थापकः—मा.सभापती, प्रतिनियुक्तीवर आहे.

सभापतीः– एका शाळेकरी मुलाचा अपघात झाला त्यावर कडक कार्यवाही केली पाहिजे. कंपनी दुर्लक्ष करीत असेल तर त्याच्यावर सुध्दा कार्यवाही करण्यात यावी. मा.सदस्यांच्या तक्रारीचे निराकरण झाले किंवा नाही हे कळण्यासाठी काय पध्दत अवलंबिण्यात येत आहे.

परिवहन व्यवस्थापकः–मा.सभापती, अशी कुठलीही सिस्टिम नाही. कोणत्याही गोष्टीचे मेंटली डिसीप्लीन राहणार नाही तोपर्यंत हे होणार नाही. नवीन टेक्नॉलॉजीनुसार जे कार्यान्वित होणार त्यात अडचण नाही ही पध्दत त्यात अभिप्रेत राहणार. शहर बसची कार्यपध्दती राहणार आहे. त्यात आपली कंडीशन प्रेझेन्ट करणे आवश्यक आहे.

सभापतीः–दोन दिवसांचा जो दौरा करण्यात येईल त्यात 200 गाडयांचे मॉनेटरींग कशी होते त्याप्रमाणे पाहणी करण्यात यावी.

श्री.नितीन साठवणेः–मा.सभापती महोदय, ड्रायव्हर जवळ बुक ठेवण्यात येते काय? त्याचे सर्विस बुक चेक झाले पाहिजे. डेपोमध्ये बस वापस येते तेव्हा ड्रायव्हर ड्रिंक करून असतो काय?हया सर्व गोष्टी या दौ–यात बघीतल्या गेल्या पाहिजे.

सभापतीः– एक प्रस्ताव विभागाला दिला होता की डेप्युटेशन पोलीस विभागाचा एक अधिकारी आणि आणि दोन–तीन कर्मचारी असा डेपोवाईज पोलीस स्टॉफ ठेवण्यात यावा. जेणेकरून कन्डॅक्टर आणि ड्रायव्हरवर याचा धाक राहील. ज्यावेळी ऑटोचालक बस चालू देत नाही तेव्हाही याची गरज पडेल यादृष्टीने सुध्दा पोलीस कमिश्नर शहरी आणि ग्रामीण यांची बैठक लावण्यात यावी.

ठराव क्रमांक २०:– आजच्या सभेची कार्यवाही कायम करून ही सभा अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
परिवहन समिती
महानगरपालिका,नागपूर